भाजीपाला

# उन्हाळी गवारीच्या २० तोडण्या अशा मिळवा



**डॉ. अमोल वीरकर**
(मो.नं. ९८९०६७८२७५)
**अर्चना सानप**
उद्यानविद्या विभाग,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर



पाण्याचा उत्तम निचरा असलेली पोयट्याची जमीन गवारीला चांगली मानवते. हलक्या जमिनीत गवारीचे पीक खुरटे राहते. शेंगा लवकर लागतात व उत्पादनही चांगले मिळते. भारी जमिनीत गवार हमखास चांगली येते. जमिनीचा सामू ७.५ ते ८ च्या दरम्यान असल्यास पिकाची वाढ उत्तम होते. लेखात दिल्याप्रमाणे पिकाची काळजी घेतल्यास १६ ते २० तोडण्या मिळू शकतात.

गवार हे उष्ण हवामानातील पीक असून, सरासरी १८ ते ३० अंश सेल्सिअस तापमानास हे पीक उत्तम येते. गवारीची लागवड खरीप आणि उन्हाळी अशी दोन्ही हंगामात केली जाते. उन्हाळी पीक शेंगभाजीसाठी घेतात. दक्षिण महाराष्ट्रातील ज्या ठिकाणी तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक आहे; अशा ठिकाणी गवारीच्या बियाणे उत्पादनास भरपूर वाव आहे.

गवारीच्या शेंगांमध्ये फॉस्फरस, चुना, लोह इत्यादी खनिजे आणि 'अ', 'ब', 'क' जीवनसत्वे बऱ्याच प्रमाणात असतात. त्यामुळे आहारदृष्ट्या गवार अतिशय लोकप्रिय भाजी आहे. बाजारात गवारीच्या शेंगांना चांगलीच मागणी असते.



**हवामान व जमीन :** पाण्याचा उत्तम निचरा असलेली पोयट्याची जमीन गवारीला चांगली मानवते. हलक्या जमिनीत गवारीचे पीक खुरटे राहते. शेंगा लवकर लागतात व उत्पन्नही चांगले मिळते. भारी जमिनीत गवार हमखास चांगली येते. जमिनीचा सामू ७.५ ते ८ च्या दरम्यान असल्यास पिकाची वाढ उत्तम होते.

**आंतरमशागत :** गवारीच्या लागवडीपूर्वी लोखंडी नांगराने जमीन १५ ते २० सें.मी. खोल नांगरून प्रतिहेक्टर १२ ते १३ टन कुजलेले शेणखत टाकून ते जमिनीत चांगले मिसळून घ्यावे. कुळवाच्या आडव्या उभ्या दोन ते तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करून घ्यावी. काडीकचरा, धसकटे वगैरे वेचून घेऊन जमीन साफ करून पिकाची लागवड सऱ्या- वरंब्यावर करावी.

**लागवडीचा हंगाम :** आपल्या हवामानात गवारीची लागवड जवळ जवळ वर्षभर करता येते. उन्हाळी पिकांची लागवड जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात दोन ते तीन हप्त्यांत करतात. गवारीची लागवड बियाणे टोकून किंवा पेरून करतात. उगवण चांगली होण्यासाठी बियाणे पेरणीपूर्वी दोन तास भिजवून सावलीत सुकवून नंतर पेरावे.

**लागवडीचे अंतर :** जमिनीची प्रत व हवामानानुसार दोन ओळींतील अंतर ४५ ते ६० सें.मी. ठेवावे आणि झाडांतील अंतर २० ते ३० सें.मी. ठेवावे. काही शेतकरी ४५ सें.मी. पाभरीने बियाणे पेरून नंतर सारायंत्राने सारे अंतरावर सऱ्या पाडून किंवा ४५ X ६० सें.मी. अंतरावर सऱ्या पडून सरीच्या दोन्ही बाजूंना दोन झाडांतील अंतर १५ ते २० सें.मी. राहील या अंतरावर दोन बिया टोकतात.

**बियाण्यांचे प्रमाण व बीजप्रक्रिया :** हेक्टरी १४ ते २४ किलो बियाणे लागवडीस पुरेसे होते. पेरणीपूर्वी १० ते १५ किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियम चोळावे. त्यामुळे मुळांवरील नत्र ग्रंथीची वाढ होऊन पिकास व जमिनीस उपयुक्त ठरते.

**सुधारित वाण :** महाराष्ट्रात देशी (सु. १.८ मीटर उंच) सोटीया (सु. २.४ मीटर) व विदेशी (सु. १.३-१.५ मीटर) असे तीन प्रकार मानण्यात येतात. विदेशी प्रकार शेंगांकरिता, सोटीया हिरवळीच्या खतासाठी व शेंगांसाठी आणि देशी मुख्यत्त्वे बियांसाठी कोरडवाहू पीक म्हणून लावतात.

**गवारीचे विविध वाण**

**पुसा सदाबहार :** ही सरळ व उंच वाढणारी जात असून, उन्हाळी व खरीप हंगामासाठी शिफारस केलेली आहे. या जातीच्या शेंगा १२ ते १५ सें.मी. लांब असून, शेंगा हिरव्या रंगाच्या असतात. शेंगांची काढणी ४५ ते ५५ दिवसांनी सुरू होते.

**पुसा नवबहार :** ही जात उन्हाळी व खरीप या दोन्ही हंगामांत चांगले उत्पादन देते. शेंगा १५ सें.मी. लांब कोवळ्या हिरव्या रंगाच्या असतात. झाडांची सरळ वाढ

होते. पानाच्या बेचक्यात शेंगांचा घोस असतो.

**सुरती गवार** : झाडास फांद्या अधिक असतात. पिकाची ही जात ऑक्टोबरनंतर व उन्हाळ्यात घेतली जात असून, तालुक्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर चालते. शेंगा जास्त पातळ, लांब, जाडसर व फताडी असून अधिक गुळचट व उभी लव असते. गुच्छ लागत नाहीत.

**देशी (गावरान) गवार** : पुसा जातीचा शोध लागण्याअगोदर ४० वर्षांपूर्वी गावोगाव देशी गवारीचे बियाणे प्रचलित होते. ही गवार आखूड, निबर, बीजयुक्त, केसाळ, खाजविणारी परंतु चविष्ट असून, खेडेगावात चवीने खाल्ली जाते. खेड्यांत व शहरांत दोन्ही ठिकाणी या गवारीला खूप मागणी आहे.

**नंदिनी (एनसीबी १२)** : ही संकरित जात असून, निर्मल सीडस् कंपनीची गावरान गवारीसारखी जात आहे. याच्या शेंगा आखूड व कोवळ्या, मऊ असतात. विशेषत: याची चवही चांगली असल्याने याला बाजारात चांगलीच मागणी असते. झाड लहान असल्यापासून पानांच्या बेचक्यात भरपूर शेंगा येतात. ही जात रोगप्रतिकारक्षम असल्याने व्यापारी लागवडीसाठी फायद्याची ठरते.

**खते व पाणी व्यवस्थापन** : गवार हे कोरडवाहू पीक घेतल्यास खतांची फारशी गरज भासत नाही. या पिकाला हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश द्यावे. लागवडीच्या वेळी नत्राची अर्धी मात्रा आणि स्फुरद व पालाशाची संपूर्ण मात्रा द्यावी. नत्राचा राहिलेला अर्धा हप्ता पेरणीनंतर तीन आठवड्यांनी द्यावा. पावसाळी पिकाला पाणी देण्याची गरज पडत नाही. उन्हाळी पिकाला लागवड केल्याबरोबर पाणी





देऊन नंतर पुढे आठ ते दहा दिवसांच्या अंतराने एकूण १२ ते १४ पाण्याचा पाळ्या द्याव्या लागतात.

**गवारीवरील कीड व रोग**

**मावा व तुडतुडे** : या किडीच्या नियंत्रणासाठी पिकावर डायमेथोएट ३० ईसी १.५ मि.लि. किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ डब्ल्यूसी किंवा मिथिलडिमेटॉन २५ ईसी दोन मि.लि. प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**भुरी** : हा बुरशीजन्य रोग असून, पानाच्या दोन्ही बाजूंवर काळपट डाग पडून नंतर संपूर्ण पान पांढरे होते. हा रोग खोड आणि शेंगांवरही पसरतो. याच्या नियंत्रणासाठी ५०% ताम्रयुक्त औषध कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम दहा लिटर पाण्यात मिसळून आठ ते दहा दिवसांच्या अंतराने तीन ते चार फवारण्या कराव्यात.

**मर** : हा बुरशीजन्य रोग असून, या रोगाची लागण झालेले झाड कोलमडून जाते. प्रथमत: झाड पिवळे पडते व बुंध्याजवळ अशक्त बनते. याच्या नियंत्रणासाठी बियाण्यास प्रतिकिलो चार ग्रॅम थायरम चोळावे. रोगट झाडाभोवती बांगडी पद्धतीने ताम्रयुक्त औषधाचे द्रावण आठ ते दहा सें.मी. खोल माती भिजेल असे ओतावे.

**काढणी व उत्पादन** : लागवडीपासून दोन महिन्यांनी शेंगा काढण्यास सुरूवात होऊन आठवड्यातून दोनदा गवार तोडणीस येते. गुच्छ लागणाऱ्या शेंगांमध्ये बारीक शेंगांचे प्रमाण अधिक येते. सर्व शेंगा एकाच वेळी तोडणीस येत नाहीत. तयार शेंगांचीच तोडणी करावी लागते. हे काम पुढे आठ ते दहा आठवडे चालू राहते. या अवधीत एकूण १६ ते २० तोडे मिळतात. सर्वसाधारणपणे हिरव्या शेंगांचे हेक्टरी उत्पन्न ६० ते ७५ क्विंटलपर्यंत येते. ■